महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
प्रकाशगंगा, प्लॉट क्र. सी -१९, 'ई' ब्लॉक,
वांद्रे - कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१
वेब साईट: - http://www.mahatransco.in/

# कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ नुसार सप्टेंबर २००८ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च आणि ऑक्टोबर २००८ ते मार्च २००९ पर्यंतचा प्रस्तावित अंदाज हयावर आधारित आर्थिक वर्ष २००८-२००९ चा वार्षिक कामगिरी आढावा करण्यासाठी ही याचिका सादर करीत आहे. उपरोल्लिखित विनियमाच्या तरतूदींनुसार महापारेषण आर्थिक वर्ष २००९-१० साठी एकूण महसूलाची गरज ठरविण्याकरिता सुधारित अंदाजसुध्दा सादर करीत आहे.

## महापारेषणची एकूण महसूलाची गरज

महापारेषणने दि. ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ पर्यंत अंकेक्षित लेखांवर आधारित प्रत्यक्ष खर्चाची माहिती पुरविली आहे. आर्थिक वर्ष २००८-०९ चा खर्च हा सप्टेंबर २००८ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च आणि उरलेल्या सहा महिन्यांकरिता पूर्वीच्या खर्चाच्या प्रमाणावर आधारित आहे. आर्थिक वर्ष २००९-१० चा प्रस्तावित अंदाज हयाच तत्वाप्रमाणे केला आहे.

अ) आर्थिक वर्ष २००७-०८ च्या प्रत्यक्ष आकडयांचा आधार घेऊन संचलन आणि सुव्यवस्थेचा खर्च अंदाजित केला आहे. म वि नि आयोगाने त्यांच्या बहुवार्षिक दर निर्धारण आदेशात ठरवलेल्या वाढ दरानुसार कर्मचा-यांवरील खर्च आणि प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च अंदाजित करण्यात आला आहे. तसेच दुरुस्ती आणि देखभाल (R&M) खर्च क्षेत्रिय कार्यालयाच्या अंदाजावर आधारलेला आहे.

ब) महापारेषणच्या भांडवली खर्चाचा सुधारित अंदाज आर्थिक वर्ष २००८-०९ साठी २४०० कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता ४८४७ कोटी रुपये आहे.

क) म वि नि आ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ नुसार घसारा ठरवण्यात आला आहे.

ड) दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज, पूर्वीचे शिल्लक कर्ज आणि त्यानंतरचे भांडवली मालमत्तेचे नवीन संगठन हयांच्यावर आधारित आहे.

ई) म वि नि आ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ अनुसार प्रमाणकांच्या आधारावर खेळत्या भांडवलावरील व्याज ठरविण्यात आले आहे. महापारेषण कंपनीने कोणतेही प्रत्यक्ष खेळते भांडवली कर्ज गृहित धरलेले नाही. आयोगाने ग्राहय धरल्याप्रमाणेच खेळत्या भांडवली कर्जाचे व्याज हे कार्यक्षमता प्राप्ती म्हणून ग्राहय धरले आणि आयोगाच्या वीज दर विनिमयातील मार्गदर्शनानुसार ग्राहकांसोबत वाटून घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

फ) इतर व्याज आणि वित्त शुल्क हे भांडवली खर्चाला वित्त पुरवठा करण्यासाठी घेतलेल्या प्रत्यक्ष कर्जावर प्रत्यक्ष रितीने ठरविण्यात आले आहे.

ग)	महापारेषणचे आयकर दायित्व, आयकर अधिनियम तत्वाप्रमाणे ठरविण्यात आलेले आहे.

ह)	महापारेषणने भाग भांडवलावरील परतावा १४% अंदाजित केला असून तो म वि नि आ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार आहे.

ल)	इतर उत्पन्न हे आधीच्या खर्चाप्रमाणे वर सत्याधारित आहे.

महापारेषणची निव्वळ महसूलाची गरज ही वरील स्थिर किंमत आणि भाग भांडवलावरील परतावा वजा इतर उत्पन्न अशी आहे. महापारेषणच्या महसूली गरजेचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे.

**महापारेषणची महसूलाची गरज**

(सर्व आकडे रुपये कोटीत)

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २००७-२००८ (अंकेक्षित प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २००८-२००९ (सुधारित अंदाज) | आर्थिक वर्ष २००९-२०१० ( अंदाज) |
|---|---|---|---|---|
| (अ) | **खर्च** | | | |
| १ | संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ५६८.८३ | ७७६.८५ | ९७०.५२ |
| १.१ | कर्मचा-यांवरील खर्च | *२४८.४४* | *४०२.०१* | *५४२.४०* |
| १.२ | प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च | *७३.८३* | *६५.०७* | *६८.११* |
| १.३ | दुरुस्ती व परिरक्षण खर्च | *२४६.५६* | *३०९.७७* | *३६०.०१* |
| २) | घसारा (त्यावरील अग्रिमासह) | ४३०.४२ | ४११.७१ | ४५५.४५ |
| ३) | दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १९४.२१ | २५९.०७ | २९९.७० |
| ४) | खेळते भांडवल आणि ग्राहक सुरक्षा ठेव यावरील व्याज | ४९.४५ | ६५.२१ | ८०.५७ |
| ५) | इतर व्याज व वित्त आकार | २६.०६ | ३४.३६ | ४४.१५ |
| ६) | इतर खर्च | ९.४८ | ६.६५ | २०.४७ |
| ७) | आयकर | ९६.५० | २४८.२० | १२७.१५ |
| ८) | आकस्मिक खर्चासाठी राखीव निधीस अंशदान | ४४.८३ | २४.५८ | २७.५४ |
| ९) | अगोदरच्या कालखंडातील समायोजन (पुनर्विलोकन याचिका) | २.८२ | | |
| १०) | **एकूण महसुली खर्च** | **१,४२२.६०** | **१,८२६.६३** | **२,०२५.५५** |
| ११) | भाग भांडवलावरील परतावा | ३९८.८८ | ४२७.६० | ४८४.५० |
| १२) | **एकूण महसूलाची गरज** | **१,८२१.४८** | **२,२५४.२२** | **२,५१०.०४** |
| १३) | वजा- पारेषण दराव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न | ७६.८६ | ८६.५९ | ८८.३२ |
| १४) | वजा- इतर उद्योगांमधून मिळणारे उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५) | वजा- गोवा पारेषण शुल्कातून मिळणारे उत्पन्न | ८.९० | ८.९० | ८.९० |
| १६) | **पारेषण शुल्कापासून एकूण महसूलाची गरज** | **१,७३५.७३** | **२,१५८.७४** | **२,४१२.८३** |

अशाप्रकारे महापारेषणाची निव्वळ महसूलाची गरज आर्थिक वर्ष २००८-०९ करिता २१५८.७४ कोटी रुपये आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता २४१२.८३ कोटी रुपये आहे.

मागील आर्थिक वर्षाकरिता लागू असलेला वीज पारेषण दर आदेश उशिरा लागू केल्यामुळे एप्रिल-मे २००८ मधील तफावतीचा भरणा महापारेषण कंपनीने खालीलप्रमाणे संकलित केलेला आहे.

**(सर्व आकडे रुपये कोटीत)**

| तपशील | बहुवार्षिक दर निर्देशन आदेशाप्रमाणे महसूल | आर्थिक वर्ष २००८-२००९ करिता मंजूर असलेला महसूल | माहे एप्रिल-मे २००८ करिता तफावतीचा भरणा |
|---|---|---|---|
| एका महिन्याचा पारेषण दर | १२८.९१ | १५५.३७ | २६.४६ |
| दोन महिन्यांचा पारेषण दर (एप्रिल-मे - २००८) | २५७.८३ | ३१०.७४ | ५२.९२ |

हयाविषयी महापारेषण सन्माननीय आयोगास प्रार्थना करते की, महापारेषणची आर्थिक वर्ष २००९-१० ची एकंदर महसूलाची गरज ठरविताना खालीलप्रमाणे खर्चाच्या रक्कमेला परवानगी द्यावी.

१) महापारेषणची निव्वळ महसूलीची गरज आर्थिक वर्ष २००७-०८ करिता १७३५.७३कोटी रु., आर्थिक वर्ष २००८-०९ करिता २१५८.७४ कोटी रु., आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता २४१२.८३ कोटी रु. इतकी आहे.

२) माहे एप्रिल-मे २००८ तफावतीचा भरणा ५२.९२ कोटी रु. आहे.

३) प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च रु. १९.३१ कोटी ही रक्कम म.रा.वि. होल्डींग कं. करिता लिस रेंटसाठी चूकती केलेली आहे, जी आर्थिक वर्ष २००६-०७ च्या तफावतीच्या भरण्या (truing up) मध्ये नाकारण्यात आली होती. सदर रक्कम ही महापारेषणच्या स्थापनेनंतर आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ करिता एकूण अदा करण्यात आलेली आहे.

४) आर्थिक वर्ष २००७-०८ च्या तफावतीच्या भरण्या (truing up) मधील रु. ४४.९७ कोटीची महसूली तूट . सदर रक्कम ही खाली नमूद केल्याप्रमाणे आलेली आहे.

अ) आयोगाच्या वीज दर विनिमयातील मार्गदर्शक तत्वानुसार कार्यक्षमता प्राप्ती, पारेषण प्रणाली उपयोगकर्त्यासोबत वाटून घेतली आहे.

ब) प्रशासकीय व सर्वसाधारण खर्चाची विभागणी प्रार्थना क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

५) चालू वर्षातील महसूलीची अंदाजित तूट रु. ४५४.७२ कोटी एवढी आहे. सदर महसूलीची तूट ही कार्यक्षमता प्राप्तीची पारेषण प्रणाली उपयोगकर्त्यासोबत वाटणी केल्यानंतर ठरविण्यात आली आहे.

म्हणून, महापारेषण सन्माननीय आयोगास प्रार्थना करते की, वीज पारेषण दर ठरविताना महापारेषणला उपरोल्लिखित तूटीसहित आर्थिक वर्ष २००९-१० करिता एकूण महसूलाची गरज वसूल करणे शक्य होईल, अशा रितीने ठरविण्यात यावेत. पारेषण वीज दर ठरविण्याकरिता महापारेषणची एकूण महसूलाची गरज खालीलप्रमाणे संकलित केली आहे.

## आर्थिक वर्ष २००९-२०१० करिता एकत्रित वार्षिक महसूलाची गरज

(सर्व आकडे रुपये कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | आर्थिक वर्ष २००९-२०१० करिता एकूण महसूलाची गरज | २४१२.८३ |
| २ | आर्थिक वर्ष २००८-२००९ करिता तात्पुरता तफावतीचा भरणा (truing up) | ४३२.९८ |
| ३ | एप्रिल-मे २००८ करिता तात्पुरता तफावतीचा भरणा (truing up) | ५२.९२ |
| ४ | आर्थिक वर्ष २००७-२००८ करिता तफावतीचा भरणा (truing up) | ४४.९७ |
| ५ | **आर्थिक वर्ष २००९-१० करिता निव्वळ एकत्रित महसूलाची गरज** | **२९४३.६९** |

### पारेषण दर निर्धारण

पारेषण दर निर्धारण संरचनेवरील सन्माननीय आयोगाच्या आदेशानुसार, राज्यातील पारेषण परवानाधारकांची एकूण महसूलाची गरज एकत्रित करुन "एकत्रित किंमत" (Pooled Cost) किंवा "एकूण पारेषण यंत्रणा किंमत" (Total Transmission System Cost) काढण्यात येते जी पारेषण प्रणालीचा उपयोग करणा-यांकडून (TSUs) वसूल करण्यात येते. प्रत्येक परवानाधारकाच्या एकूण महसूलाच्या गरजेची वसूली, सर्व पारेषण परवानाधारकांच्या सर्वसाधारण एकूण पारेषण यंत्रणा किंमतीशी जोडलेली असल्याने, म्हणून महापारेषणने आर्थिक वर्ष २००९-२०१० तसेच नियंत्रण कालावधीकरिता कुठलीही वीज दर याचिका सादर केलेली नाही.

महापारेषण कंपनीने याचिकेत प्रत्येक पारेषण प्रणाली उपयोगकर्त्यांवर (TSU) येणारा एकूण पारेषण यंत्रणा किंमतीचा (TTSC) वाटा आयोगाने हयापूर्वी ठरविलेल्या को-इन्सिडंट पीक डिमांडवर न ठरविता तो राज्य भार प्रेषण केंद्राने (SLDC) दिलेल्या मागील वर्षातील सरासरी वार्षिक अनुसूची (Yearly Average Schedule) वर ठरविण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला आहे. त्याबाबत तपशीलवार विवरण याचिकेच्या विभाग ३.५ मध्ये केलेले आहे. त्याबाबत आयोगाने योग्य वाटल्यास तशी मंजूरी द्यावी, अशी विनंती आहे.

### प्रार्थना

अ) हया याचिकेत केलेल्या सादरीकरण आणि संयुक्तिकरणानुसार महापारेषणने आर्थिक वर्ष २००७-०८, आर्थिक वर्ष २००८-०९ आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता प्रस्तावित केलेल्या एकूण महसूली गरजेला कृपया मंजूरी देण्यात यावी.

ब) आर्थिक वर्ष २००९-१० च्या महसूली गरजेसोबतच हया याचिकेत उहापोह केल्याप्रमाणे आधीच्या कालावधीच्या खर्चासंबंधी इतर समायोजन कृपया मंजूर करण्यात यावेत.

क) आर्थिक वर्ष २००९-१० करिता महसूलाची गरज ही रु. २९४३.६९ कोटी एवढी या याचिकेत अंदाजित केल्याप्रमाणे मंजूर करावी.

ड) आवश्यकतेनुसार महापारेषणला याचिकेमध्ये सुधारणा करण्याची परवानगी द्यावी.

इ) कुठलीही चूक /वगळणूक कृपया क्षमा करण्यात यावी आणि त्या सुधारण्याची संधी देण्यात यावी.